**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
मुख्य इमारत, १ ला मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी क्रमांक -०२२-२२७९३७१६ ई मेल-dol१cell.rfd@maharashtra.gov.in

---

क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१३/ल-१. दिनांक :- २१/१/२०२५

प्रति,

**विभागीय आयुक्त (सर्व)**

**विषय**: AgriStack संकल्पनेची अंमलबजावणी नागरी सुविधा केंद्राच्या (CSC) माध्यमातून करणेबाबतच्या अनुषंगाने मार्गदर्शन सूचना.

**संदर्भ**: १) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांचे कडील शासन निर्णय - संकीर्ण/प्र. क्र.१५७/१०- अे, दिनांक १४.१०.२०२४

२) मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचे पत्र क्र संकीर्ण-२०२२/प्र क्र.३१३/ल-१ दिनांक २९.११.२०२४

३) जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडील पत्र क्र. रा. भू. ४/AgriStack /MappingCSC/२०२५, दि.१३.०१.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास संदर्भिय क्र.१ अन्वये केंद्र शासनाच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर अंतर्गत AgriStack हा प्रकल्प संपूर्ण देशामध्ये राबविणे बाबत कृषी विभागाने दिनांक १४.१०.२०२४ रोजी शासन निर्णय पारित केला आहे. त्या अनुषंगाने मोहीम स्वरूपात कार्यवाही सुरु करणेबाबत मार्गदर्शन सूचना संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये आपणास देण्यात आलेल्या आहेत. AgriStack संकल्पनेच्या शेतकरी ओळख क्रमांक निर्मिती प्रक्रियेस गतिमान करण्यासाठी आता शासनाच्या AgriStack सुकाणू समितीने दिनांक ०९.०१.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये संपूर्ण राज्यात नागरी सुविधा केंद्राची (CSC) मदत घेऊन शेतकरी ओळख क्रमांक निर्मितीचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शन सूचना खालीलप्रमाणे आहेत.

२) संदर्भीय पत्र क्र.२ च्या पत्रान्वये आपणास गावनिहाय कॅम्प चे नियोजन करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने आपणाकडून कॅम्पसाठी जे वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले आहे, त्या वेळापत्रकानुसार संबंधित गावात कॅम्पचे आयोजन करावे. तथापि, या आयोजनासाठी कृषी सहाय्यक आणि ग्राम विकास अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

१. कॅम्पच्या पूर्वी घरोघरी जाऊन गावातील लाभधारक शेतकरी संख्या (ज्यांचे शेतकरी ओळख क्रमांक काढावे लागतील अशी) निश्चित करावी, ज्यामुळे किमान तीनशे शेतकरी क्षमतेचे कॅम्प चे नियोजन खात्रीशीर रित्या करता येईल.

२. कॅम्प पूर्वी कॅम्पसाठी जागा निश्चित करावी. कॅम्पसाठी जागा निश्चित करताना गावातील सर्वाधिक इंटरनेट कनेक्टीविटी असणारी जागा निवडावी.

३. भारतनेट प्रकल्प अंतर्गत सर्व ग्राम पंचायतींमध्ये इंटरनेट कनेक्टीविटी देण्यात आलेली आहे, त्यामुळे या उपलब्धतेचा विचार वरील कामकाजासाठी करावा.

४. कॅम्पच्या ठिकाणी मुलभूत सुविधा जसे की पिण्याचे पाणी, स्वच्छता, आवश्यक खुर्च्या, टेबल. प्रसिद्धी पत्रके, कॅम्प फलक इत्यादी साधनसामग्री उपलब्ध असावी.

५. कॅम्पच्या तारखा या गावातील तसेच बाहेर गावी राहणाऱ्या लोकांना आगाऊ (शक्यतो किमान आठ दिवस अगोदर) कळवाव्यात, त्यासाठी योग्य ती पूर्व प्रसिद्धी करण्यात यावी.

६. कॅम्पमध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच स्थानिक माध्यमांचा वापर करावा.

७. कॅम्प दरम्यान ओळख पटविण्यासाठी आधार क्रमांकासोबत संबंधित व्यक्तीचा मोबाईल क्रमांक जोडल्यास प्रक्रिया सोपी होईल. यासाठी कॅम्पपूर्वी गावात आधार क्रमांकाला मोबाईल क्रमांक जोडण्याची मोहीम हाती घेण्यासाठीचे नियोजन करावे.

८. कॅम्पसाठी नेमलेल्या पथक कर्मचाऱ्यांनी कॅम्पपूर्वी एकत्र येऊन प्रत्येक गावातील परिस्थिती पाहून कॅम्पसाठी नियोजन करावे.

९. त्या गावातील कोणत्याही कृषी योजनांचे लाभ घेणारे सर्व लाभधारकांना शेतकरी ओळख क्रमांक मिळेल याची दक्षता घेण्याची जबाबदारी ही कृषी सहाय्यक यांची राहील.

प्रत्येक तालुक्यातील कृषि व ग्रामविकास अधिकारी यांनी उपरोक्त कामकाजाचा आढावा घ्यावा व कामकाज गतिमान होणेसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात.

३) कॅम्प आयोजनामध्ये ग्राम महसूल अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:

१. ग्राम महसूल अधिकारी यांनी सर्व नागरी सुविधा केंद्र चालकांशी संपर्क करून नागरी सुविधा केंद्र चालकांचा प्रत्येक गावाच्या कॅम्पमध्ये सहभाग सुनिश्चित करणे.

२. कॅम्प दरम्यान नागरी सुविधा केंद्राकडे येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक निर्मितीसाठी नागरी सुविधा चालक उपलब्ध राहील या बाबतचे व्यवस्थापन व संचालन करावे.

३. नागरी सुविधा केंद्रात येणाऱ्या शेतकऱ्यांचे आधारकार्ड वरील नाव आणि अधिकार अभिलेखांमध्ये (RoR) असलेले नाव यांचा 'Name Match Score' जर ८०% पेक्षा जास्त असेल, तर त्यांचा शेतकरी ओळख क्रमांक हा Automatic निर्माण होईल.

४. शेतकरी यांचे आधारकार्ड वरील नाव आणि अधिकार अभिलेखांमध्ये (RoR) असलेले नाव यांचा 'Name Match Score' जर २०% ते ८०% असेल, तर ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्यांची ओळख पटवून त्याची नोंद करण्याच्या प्रक्रियेस मान्यता द्यावी अथवा रद्द करावी, मात्र दोन्हीचे योग्य कारण नमूद करावे. तसेच सर्व मंजूर व नामंजूर अर्जांच्या याद्या आपल्या स्तरावर कारणासह तयार ठेवाव्यात.

५. शेतकरी यांचे आधारकार्ड वरील नाव आणि अधिकार अभिलेखांमधील नाव (RoR) यांचा 'Name Match Score' जर ०% ते २०% असेल, तर असे अर्ज ग्राम महसूल अधिकाऱ्याने मंजूर/ नामंजूर शेऱ्यासह ते तहसिलदार यांचेकडे पाठविण्याची सुविधा App मध्ये आहे. त्यानुसार ग्राम महसूल अधिकारी यांनी मंजूर किंवा नामंजूर बाबत शेरा नमूद करावा. तहसिलदार यांनी

शेतकऱ्यांच्या ओळखीची योग्य पडताळणी करून खात्रीनुसार त्यावर योग्य निर्णय घेऊन अर्ज मंजूर/ नामंजूर करावा.

६. ग्राम महसूल अधिकाऱ्याकडून वरीलप्रमाणे कॅम्पमधील कामकाज करून घेणे व तहसिलस्तरावरून गावांचे Mapping चे कामकाज करणे ही प्रत्येक तालुका तहसिलदार यांची जबाबदारी राहील. याबाबतच्या सविस्तर सूचना जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडील पत्र क्र. रा. भू.४/AgriStack/MappingCSC/२०२५, दि.१३.०१.२०२५ अन्वये दिल्या असून तहसिलदार यांनी ग्राम महसूल अधिकारी व संबंधित गावे यांचे mapping व आवश्यकतेनुसार दुरुस्त्या करणे ही कार्यवाही आपल्या लॉगीन मधून करून कॅम्प आयोजनासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध राहील याची दक्षता घ्यावयाची आहे.

४) कॅम्प आयोजनामध्ये तहसिलदार यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:

१. तहसिलदार यांनी तालुक्यातील सर्व नागरी सुविधा केंद्र चालकाची बैठक घ्यावी.

२. कॅम्प मोड करिता गावनिहाय तयार वेळापत्रकानुसार गावनिहाय नागरी सुविधा केंद्रांची नेमणूक करावी.

३. प्रत्येक गावाला जास्तीत जास्त नागरी सुविधा केंद्र उपलब्ध करून देता येईल याची दक्षता घ्यावी.

५) कॅम्पचे नियोजनबद्ध कामकाज होईल यासाठी आवश्यक पर्यवेक्षणाच्या सूचना यापूर्वी संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये दिल्या असून त्यानुसार विभाग, जिल्हा, उपविभाग तसेच कृषी आयुक्त व सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कामकाज करावे. तसेच AgriStack संकल्पनेची अंमलबजावणी हि नागरी सुविधा केंद्राच्या (CSC) माध्यमातून करणेबाबत मार्गदर्शक सूचना आपले अधिनस्त जिल्हाधिकारी यांना आपले स्तरावरून देण्यात याव्यात व मोहीम यशस्वी होणेसाठी आवश्यक उपाय योजना कराव्यात.

आपला

**(राजेश कुमार)**

**अपर मुख्य सचिव (महसूल)**

**महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई**

प्रत : १. प्रधान सचिव, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

२. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे

३. कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

४. जिल्हाधिकारी (सर्व), यांना माहितीस्तव आणि आवश्यक कार्यवाहीसाठी.

५. मुख्याधिकारी, (महाराष्ट्र.राज्य), CSC, SPV

उपरोक सुचानाचे कृपया अवलोकन करावे, आपले अधिनस्त सर्व जिल्हा प्रमुखांनी तात्काळ जिल्हाधिकारी यांची भेट घ्यावी व पत्रात नमूद कार्यवाहीसाठी आपले स्तरावरून योग्य ते निर्देश निर्गमित करावे व तसे या कार्यालयास आणि जमाबंदी आयुक्त कार्यालयास अवगत करावे.